वेळ : अडीच तास

गुण : ७५

प्र. १. मराठीतील आत्मचरित्र या साहित्य प्रकाराच्या ऐतिहासिक परंपरेचा सोदाहरण आढावा घ्या.

किंवा

एक कथनात्मक साहित्य प्रकार म्हणून आत्मचरित्राचा अभ्यास करताना त्याचे कोणते घटक विचारात घ्यावे लागतात, याची सोदाहरण चर्चा करा.

प्र. २. "जगायचंय प्रत्येक सेकंद!' आत्मकथनातून डॉ. यशवंत केवळे यांच्या उत्कट जीवनेच्छेचे अत्यंत प्रत्ययकारी दर्शन घडते,"या विधानाचा सोदाहरण परामर्श घ्या. १५

किंवा

"जगायचंय प्रत्येक सेकंद!' आत्मकथनातून डॉ. यशवंत केवळे यांच्या सकारात्मक जीवनदृष्टीचे अत्यंत प्रत्ययकारी दर्शन घडते,"या विधानाची उदाहरणांसहीत चर्चा करा. १५

प्र. ३. 'मी तो हमाल' या आत्मकथनातून भूक, दारिद्र्य, अंधश्रध्दा आणि शोषण ही आशयसूत्रे कशी प्रकट होतात, ते सोदहारण स्पष्ट करा.

किंवा

"आपल्याबरोबर इतरांनाही समर्थ बनवावे, त्यासाठी आपल्या हमाल सहकाऱ्यांना संघटित करावे या आप्पा कोरपे यांच्या स्वभाव विशेषाने 'मी तो हमाल' या आत्मकथनाला व्यापक जीवनाचा संदर्भ लाभला आहे, " या विधनाची सोदाहरण चिकित्सा करा. १५

प्र. ४. टीपा लिहा.

अ) आत्मचरित्रातील निवेदक

किंवा

आत्मकथन - एक साहित्य प्रकार ५

ब) 'जगायचंय प्रत्येक सेकंद !' मधील नायकाची शिक्षणाची जिद्द

किंवा

'जगायचंय प्रत्येक सेकंद !' मधील मंगला ५

क) 'मी तो हमाल' मधील भुकेचे चित्रण

किंवा

'मी तो हमाल' मधील लेखनाची भाषिक वैशिष्टये ५

प्र.५. अ) खालीलपैकी कोणत्याही ५ प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. मंगला केवळे कोणत्या बँकेत काम करत होत्या?

२. शाळेत शिकत  असताना डॉ. यशवंत केवळे काय काम करायचे?

३. यशवंताने नोकरीचा राजीनामा का दिला?

४. डॉ. यशवंत केवळे यांचा मृत्यू कसा झाला?

५. आप्पा कोरपे कोणत्या संघटनेचे उपाध्यक्ष झाले?

६. आप्पा कोरपे यांनी लिहिलेल्या कथा संग्रहाचे नांव लिहा.

७. आप्पा कोरपेंना त्यांचे अनुभव कामगारांसमोर यायला पहिजेत असे कोणी सांगितले?

८. आप्पा कोरपे यांच्या आईने कोणाचे भगुलं चोरले?

ब) खालील प्रश्नांची योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा.

१. मराठीत खऱ्या अर्थाने आत्मचरित्र लेखनाची सुरूवात कोणत्या शतकात झाली?

अ) १८व्या शतकात    ब) १९व्या शतकात    क) २१व्या शतकात

२. 'बलुतं ' या आत्मकथनावर आधारित चित्रपटाचे नांव काय?

अ) अंकुश    ब) अत्याचार    क) संघर्ष

३. 'जिणं आमुचं ' हे आत्मकथन कोणी लिहीले आहे?

अ) शांताबाई कांबळे    ब) बेबीताई कांबळे    क) जनाबाई गिऱ्हे

४. 'मरणकळा' या आत्मकथनांतून कोणत्या समाजाचे चित्रण आले आहे?

अ)  कोल्हाटी समाज    ब) गोपाळ समाज    क)  कैकाडी समाज

५. भीमराव गस्ती यांनी लिहिलेल्या आत्मकथनाचे नांव काय?

अ) गबाळ    ब) बेरड    क) अंतस्फोट

**********************